# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००८९५

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
Lakshdham High School & Jr. Colllege
Gen. A.K. Vaidya Marg, Goregaon (E),
Mumbai 400063.

**विरुद्ध**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक**
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
आय.वाय. कॉलेज कंपाऊंड, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ४०००६०.

**अपिलार्थीश्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०३.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०५.२०२२ | | | २४.०८.२०२२ |

श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड यांनी दि. १४.०५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार गोकुळधाम हायस्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, गोरेगाव पु. मुंबई, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव पु. व यशोधाम हायस्कूल, गोरेगाव पु. या शाळांची आरटीई अंतर्गत झालेल्या प्रवेशांतर्गत ५ मुद्यांवर माहिती विचारली होती.

सदर अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतेही उत्तर न मिळाल्याने अर्जदार यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील प्राप्त झाल्यावर मुख्याध्यापक, यशोधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व) यांनी दि.१८.०८.२०२२ रोजी शिक्षण निरीक्षक यांना त्यांचे पत्र लिहिलेले आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, आमची शाळा ही खाजगी विनाअनुदानित संस्था आहे. म्हणजेच आम्हाला राज्य/ केंद्र सरकार किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून निधी/ अनुदान मिळत नाही. तसेच, विनाअनुदानित संस्थांना किंवा ट्रस्टला माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही.

सदर माहिती अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, पश्चिम विभाग यांनी दि. २४.०८.२०२२ रोजी सदर कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. ०१ व मुद्दा क्र. ०४ मधील सन २०२२-२३ मधील इ. १ ली तील प्रवेशित विद्यार्थ्यांची व उर्वरित प्रवेशाची माहिती शाळेने उपलब्ध करुन अर्जदारास स्वखर्चाने देण्यात यावी व मुद्दा क्र. ०२ ची माहिती या

..२/-

कार्यालयाने दि. २४.०८.२०२२ पर्यंत द्यावी. मुद्दा क्र. ०३ व ०४ ची माहिती यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मुद्दा क्र. ०५ च्या माहितीकरिता अर्जदाराने यशोधाम हायस्कूल, गोकुळधाम हायस्कूल व लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव या शाळांना स्वतंत्ररित्या अर्ज करुन माहिती मागवावी व शाळेने नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच मुद्दा क्र. ०५ मधील शासन निर्णयाची प्रत अर्जदारास शिक्षण निरीक्षक कार्यालयाने माहितीसोबत दि. २४.०८.२०२२ पर्यंत द्यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशविरुध्द जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशोधन हायस्कूल, गोरेगाव (पूर्व) यांनी आयोगाकडे दि. २९.०३.२०२३ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशोधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व) यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०६.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २६.०३.२०२५**

निर्गमित
दिनांक 03 APR 2025

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/०००८९५**
**अपिलार्थी श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड**
**सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२५ (In continuation of order dt २६.०३.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (अधिवक्ता) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव (पू) यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह उपस्थित राहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव (पू) यांचे अधिवक्ता उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी या सुनावणीस देखील अनुपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणताही खुलासा आयोगास सादर केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांचे अधिवक्ता यांनी आयोगासमोर सादर केले की, त्यांची शाळा Right to Education च्या अंतर्गत येते हे त्यांना मान्य आहे. तसेच शाळा विनाअनुदानित असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही.

आयोगाने विचारणा केल्यावर अपिलार्थी यांनी सदर संस्थेवर माहिती अधिकार अधिनियम लागू होतो याविषयी कोणताही युक्तिवाद अथवा पुरावे सादर करु शकले नाही. अपिलार्थी यांनी आयोगासमोर सादर केले की, जेव्हा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल सुनावणी घेतली तेव्हा संबंधित शाळा किंवा संबंधित संस्था माहिती अधिकाराअंतर्गत येते.

जन माहिती अधिकारी यांचे अधिवक्ता यांनी आयोगासमोर सादर केले की, मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ पक्षाने केलेल्या तक्रारीवर कारवाई करु नये असे निर्देश देण्यात आले आहे. सदर निर्देश या प्रकरणी लागू होतात कारण की, अपिलार्थी एका वर्तमानपत्राचे संपादक आहेत. तसेच सदर अपिल त्यांच्या मुलीच्या शालेय शिक्षण शुल्कासदंर्भात झालेल्या वादानंतर उद्भवलेले आहे.

सदर प्रकरणी पुनर्सुनावणी घेण्यात येईल. प्रथम अपिलीय मागील सुनावणीस अनुपस्थित होते आणि आजही अनुपस्थित आहेत. तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई का प्रस्तावित करु नये याबाबतच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित राहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.०५.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०७.०५.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/०००८९५**
**मुळ अर्जदार श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड**
**सुनावणी दिनांक : २८.०५.२०२५ (In continuation of order dt ०७.०५.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने प्रथम अपिलीय अधिकारी मागील सुनावणीस अनुपस्थित होते आणि आजही अनुपस्थित आहेत. तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई का प्रस्तावित करु नये याबाबतच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

मागील सुनावणीच्या वेळी मुळ अर्जदार श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड यांचा दि. ०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशात अनावधानाने अपिलार्थी म्हणून उल्लेख झालेला आहे. या प्रकरणी मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव हे अपिलार्थी आहेत व श्री. रविंद्र एन. आढाव व श्री. दिपक डी. गायकवाड हे मुळ अर्जदार आहेत.

आजच्या सुनावणी वेळी मुळ अर्जदार, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक यांनी त्यांचा लेखी खुलासा दि. २८.०५.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, *"आपल्या कार्यालयाकडे केलेला व्दितीय अपिल अर्ज या कार्यालयास वेळेत प्राप्त न झाल्याने सदर सुनावणीस उपस्थित राहता आले नाही. तसेच व्दितीय अपिल अर्जाच्या सुनावणीस अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिल्यामुळे पुढील सुनावणी दि.०६.०५.२०२५ रोजी आपणांकडून आयोजित करण्यात आलेली होती. परंतु, या कार्यालयातील श्री. सुनिल तांबे. लिपिक यांच्याकडे आवक जावक शाखेचा कार्यभार असून सदर कर्मचाऱ्यांनी वरील सुनावणीबाबतची कागदपत्रे विहित वेळेत कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिलेली नसल्यामुळे सदरील सुनावणीसदेखील उपस्थित राहू शकलो नाही. तरी सदर कर्मचाऱ्यांनी सुनावणीची कागदपत्रे कार्यालयाच्या निदर्शनास आणून न दिल्यामुळे त्यांना या कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच या कार्यालयाचे न क्र.शिनि/पवि/आस्था/२०२५/२७२२, दि. २१.०५.२०२५ अन्वये मला अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तरी यापुढे आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अपिल अर्ज सुनावणीबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. कृपया वरीलप्रमाणे खुलासा मान्य करावा ही विनंती."*

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०८.२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले होते:-

*"सदर कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. ०१ व मुद्दा क्र. ०४ मधील सन २०२२-२३ मधील इ. १ ली तील प्रवेशित विद्यार्थ्यांची व उर्वरित प्रवेशाची माहिती शाळेने उपलब्ध करुन अर्जदारास स्वखर्चाने देण्यात यावी व मुद्दा क्र. ०२ ची माहिती या कार्यालयाने*

..२/-

*दि.२४.०८.२०२२ पर्यंत द्यावी. मुद्दा क्र. ०३ व ०४ ची माहिती यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मुद्दा क्र. ०५ च्या माहितीकरिता अर्जदाराने यशोधाम हायस्कूल, गोकुळधाम हायस्कूल व लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव या शाळांना स्वतंत्ररित्या अर्ज करुन माहिती मागवावी व शाळेने नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच मुद्दा क्र. ०५ मधील शासन निर्णयाची प्रत अर्जदारास शिक्षण निरीक्षक कार्यालयाने माहितीसोबत दि.२४.०८.२०२२ पर्यत द्यावी.*

जन माहिती अधिकारी यांनी उक्त आदेशाच्या अनुषंगाने मुद्दा क्र. २ ची माहिती मुळ अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मुळ अर्जदार यांनी मान्य केले की, मुद्दा क्र. २ ची माहिती प्राप्त झालेली आहे व त्यांना आरटीई अंतर्गत सन २०२२- २३ मधील इयत्ता १ ली व उर्वरित प्रवेशाची माहिती संबंधीत शाळेकडून आतापर्यंत मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांचे अधिवक्ता यांनी असे सादर केले की, त्यांची शाळा विनाअनुदानित असल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक यांनी मान्य केले की, सदर शाळेस शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही. मुळ अर्जदार संबंधीत शाळा माहिती अधिकार अंतर्गत येते याविषयी कोणतेही पुरावे आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

मुळ अर्जदार यांनी सादर केले की, त्यांना संबंधीत शाळेकडून आरटीई अंतर्गत प्रवेशीत विद्यार्थ्यांची माहिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांचे अधिवक्ता यांनी असे सादर केले की, त्यांची शाळा माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत येत नसल्याने मुळ अर्जदारास तशी माहिती उपलब्ध करुन देणे त्यांच्यावर बंधनकारक नाही.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांनी घेतलेली भुमिका योग्य आहे. जर मुळ अर्जदारांची आरटीई संदर्भात सदर शाळेविरुध्द काही तक्रार असेल तर त्यांनी स्वतंत्ररित्या शिक्षण निरीक्षक कार्यालयास तशी तक्रार करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०८.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांना मुद्दा क्र. १ व ४ बाबत दिलेले आदेश रद्द करण्यात येत आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लक्षधाम हायस्कूल, गोरेगाव यांची अपील मंजूर करुन निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**